# राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे कोल्हापूर संस्थानांच्या आर्थिक विकासातील योगदान

**प्रा. अरूणा खंडू सकटे,** लेखक अर्थशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**प्रा. संग्राम केरबा पाटील,** सह लेखक अर्थशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज होय. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्त्वाच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांच्या जवळ होते.त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थान पुरतेच मर्यादित न राहता अखिल महाराष्ट्रात नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. शाहू महाराज करवीर संस्थानाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी करवीर संस्थानाची परिस्थिती कशी होती याबाबत इंग्रज अधिकारी डी.सी. ग्रहम यांनी कोल्हापूर संस्थानाचा अहवाल तयार करताना म्हणतात "समाजाच्या सर्व वर्गात अज्ञान भरलेले होते ,सरदारांना आपली सही करता येत नव्हती, शासकीय नोकरांना साधी पत्रे तयार करता येत नव्हती." त्यावेळी कोल्हापूर संस्थानात 224 शाळा होत्या त्यामध्ये 14819 विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थानाची लोकसंख्या नऊ लाख दहा हजार इतकी होती म्हणजे एकूण लोकसंख्येच्या 1.62% मुले शिक्षण घेत होती आणि शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण होते फक्त शेकडा 3.75 टक्के इतके होते अशी परिस्थिती सर्वत्र होती .या भयान अंधकार अज्ञानी परिस्थितीत शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे सूत्रे हाती घेतली .एक आदर्श राजा बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकले सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे या कर्तव्याच्या अनुषंगानेच वेळोवेळी त्यांनी स्वतः मार्गदर्शन घेतले या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वरचे सोन निर्माण केले होते आणि हे वर्चस्व टिकवण्यासाठी बहुजन समाजावर अनेक प्रकारची सामाजिक धार्मिक बंधने लाभलेली होती आणि या बंधनातूनच त्यांना मुक्त करण्यासाठी किंवा त्यांची सुटका करण्यासाठी त्यांना सुशिक्षित बनवण्यासाठी जागृत करण्यासाठी अनेक प्रगत समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराज यांनी आपले कार्य सुरू केले .आपल्या ध्येयधोरणात व कार्यपद्धतीत कोणत्या प्रकारचा बदल केला नाही त्यांच्या या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्त्वाचा बहुजन समाजाच्या लोकनेता म्हणून लोकप्रियता मिळाले आधुनिक काळात महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहताना राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य खूप महत्त्वाचे आहे.

छत्रपती शाहू महाराज हे जन्मतः राजघराण्यातील नव्हते ते कागलच्या घाडगे घराण्यातील होते .त्यांना त्यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला त्यांच्या जनक पित्याचे व मातेचे नाव श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाडगे होते. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते कागल चे घाडगे घराणे विजापूरकरच्या दरबारात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत व पेशव्यांच्या काळात असामान्य पराक्रमाविषयी प्रसिद्ध होते. 1708 मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले त्यानंतर या सत्तेवर छत्रपती दुसरा शिवाजी छत्रपती संभाजी छत्रपती तिसरे शिवाजी छत्रपती आबासाहेब महाराज, छत्रपती बुवासाहेब महाराज ,छत्रपती बाबासाहेब महाराज, छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती चौथी शिवाजी हे सत्ताधीश बनले .आपल्या 28 वर्षाच्या कारकीर्दीत छत्रपती शाहू महाराजांनी अनेक उल्लेखनीय कामे केलेले आहेत. आपणास मिळालेल्या या सत्ता व अधिकाराचा उपयोग संस्थानामधील सामान्यजणांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न शाहू महाराज यांनी केलेला आहे आणि त्यामध्येच कोल्हापूर जिल्ह्यातील किंवा कोल्हापूर संस्थांचा आर्थिक विकासाकडे त्यांनी भर दिलेला आहे .कारण शाहू महाराजांच्या अगोदरच्या पाच छत्रपतींना इंग्रजांशी विरोध करीत व त्यांचे वर्चस्व सहन करीत जीवन जगावे लागले छत्रपती चौथे शिवाजी यांचा तर या संघर्षात अंत झाला तसेच बहुजन समाजातील एकही व्यक्ती उच्च अधिकार पदावर नव्हते त्यामुळे अशा स्थितीत अधिकार ग्रहण केल्यानंतर कोणते धोरण स्वीकारावे याविषयी निर्णय घेणे छत्रपती शाहूंना आवश्यक बनले आणि त्यामुळेच ही स्थिती सुधारण्यासाठी सर्वप्रथम बहुजन समाजाच्या शिक्षणाचा मोठा प्रसार होण्याची आवश्यकता त्यांनी जाणवली आणि त्यासाठी त्यांनी आपले विशेष कार्य सुरू केले छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या पदाचा सत्तेचा वापर हा तळागाळातील लोकांसाठी झाला पाहिजे यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले आणि त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा पूर्णपणे आर्थिक विकास करण्याची त्यांना गरज भासू लागली कारण जनता ही राजाची सर्वात पहिली जबाबदारी असते असं त्यांना जाणवू लागले आणि त्यामुळेच त्यांनी समाजाच्या आर्थिक विकासावरच इतर क्षेत्राची सर्वांगीण विकास अवलंबून असतो हे जाणले आणि त्या दृष्टीने आपले कार्य सुरू ठेवले.

**उद्दिष्टे** :

1)शाहू महाराज यांचे आर्थिक विकासातील योगदान याचा अभ्यास करणे .

2) शाहू महाराज यांचे कृषिविषयक धोरणाचा अभ्यास करणे.

3)शाहू महाराज आणि सेवा क्षेत्राचा विकास याचा अभ्यास करणे .

4)शाहू महाराज यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी केलेल्या योगदानाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

सदरचा शोध निबंध हा पूर्णपणे दुय्यम सामग्री वर आधारलेला आहे. या शोधनिबंधासाठी आवश्यक असलेली माहिती ही पुस्तके ,मासिके ,लेख यामधून घेतलेली आहे.

**आर्थिक क्षेत्रातील महाराजांचे कार्य :**

कोणत्याही देशाचा किंवा संस्थानाचा किंवा राज्याचा आर्थिक विकास हा शेती क्षेत्रावर ,उद्योगधंदे, व्यापार व सेवा क्षेत्रावर अवलंबून असतो आणि हीच गोष्ट विचारात घेऊन शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात समाजाच्या आर्थिक विकासावरच इतर क्षेत्रातील सर्वांगीण विकास अवलंबून असतो याची जाणीव झाली आणि त्यांनी आर्थिक विकासासाठी शेती, उद्योगधंदे ,व्यापार व सहकार या क्षेत्रात नवीन उपाययोजना केली संस्थानातील समाजाचा पूर्णपणे कायापालट घडवून आणला.

कृषी विषयक धोरण राजश्री संस्थानाच्या राज्यकारभाराचे सूत्रे स्वीकारल्यापासून संस्थांच्या शेती विकासासंदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आणि याचाच परिणाम म्हणजे 1902 च्या युरोप दौऱ्यात रॉयल एग्रीकल्चर सोसायटी ऑफ इंग्लंड या नामांकित शेती संशोधन संस्थेने राजश्री शाहू महाराज यांना आपले सभासदत्व बहार केले. शेतीचे महत्व किती आहे हे समाजाला पटवून देताना त्यांनी एक वाक्य म्हटले आहे, देशातील 80% पेक्षा अधिक लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे त्यामुळे माझ्या संस्थानाच्या दृष्टीने विचार केला असता कृती रूपाने माझे सर्व राज्यात शेतीच्या प्रगतीवर अवलंबून आहे त्यामुळे माझ्या संस्थानातील प्रत्येक व्यक्तीला शेती विकासाच्या दृष्टिकोनातून मदत करण्यासाठी मी स्वतः कष्ट करत आहे आणि फक्त हे बोलूनच थांबले नाहीत तर त्यांनी स्वतःच्या मुलाला शेतीचे शिक्षण दिले आणि मग त्यांनी इतरांना सांगितले म्हणजेच काय तर त्यांनी स्वतः शेतीच्या विकासासाठी पुढाकार घेऊन शेतीतील प्रगत तंत्रज्ञान स्कॉटलंड सारख्या विविध देशांना भेट देऊन भारतात आणले आणि त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. शाहू महाराज यांना माहिती झाले होते की भांडवलाच्या कमतरतेमुळे शेतकरी हा मागासलेला आहे आणि त्यामुळे जेव्हा राज्यकारभार त्याने हाती घेतला तेव्हा त्यांनी सर्वप्रथम भांडवलाची कमतरता दूर करण्याच्या उद्देशाने पावले उचलले आणि त्यामुळेच त्यांना व्याज विरहित कर्जे शेतीच्या विकासासाठी दिली जावीत असा त्यांनी एक आग्रह धरला आणि त्यातूनच शेतकऱ्यांची सावकाराकडून होणारे पिळवणूक थांबवायची होती आणि याचाच भाग म्हणून राजश्रीने संस्थानात सहकारी संस्था स्थापन केल्या व त्यांच्या मार्फत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुद्धा अल्प व्याज दराने कर्ज पुरवठा केला. याचप्रमाणे त्यांनी जमिनीच्या विभाजीकरणाला सुद्धा विरोध केला कारण भारतातील शेती उत्पादन वाढीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा जर कोणता असेल तर तो शेतीचा लहान आकार होय कारण भारतात परंपरेने जमिनीचे वाटप हे वारसा हक्काने एकमेकांच्याकडे हस्तांतरित होत असते त्यामुळे परिणामी जमिनीचा आकार हा लहान लहान होत जातो आणि त्यामध्ये आधुनिक यंत्रे तंत्रज्ञानाचा वापर करणे शेतकऱ्याला शक्य होत नाही आणि हे जर थांबवायचे असेल तर सर्वप्रथम जमिनीचे विभाजीकरण थांबणे गरजेचे होते आणि हीच बाब ओळखून शाहू महाराज यांनी शेतीच्या विभाजनाला विरोध केला तेवढ्यावरच न थांबता 22 मार्च 1920 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अध्यक्षतेखाली माणगाव येथे जी अस्पृश्य जनतेची परिषद भरली होती त्यामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलताना तेथील जनतेला उद्देशून राजश्री शाहू महाराज म्हणाले होते आज सर्व लोक वतनाच्या मागे लागत आहेत ते वतन तरी किती एक दोन अरे जमीन पाटीभर धान्य यात कोणाचे पोट भरत नाही परंतु अशा स्थितीत वतनाच्या आशीने गावी राहणे भाग पडल्याने पोट भरण्याकरता चोऱ्या वगैरे गुन्हे करण्याशिवाय त्यांना दुसरा मार्ग उरला नाही म्हणून मी सर्व बोलूतेदारास वतनदारास अशी विनंती केली की लहान लहान वतने व बलुते यांच्यामागे तुम्ही लागू नका ते सोडून द्या.कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी शेतीतून उत्पादित केलेला माल विकण्यासाठी त्यांच्याकडे विकण्यासाठी कृषी संघटनांची बांधणी आणि सहकार कायद्याची अंमलबजावणी केली आणि त्याचाच एक भाग म्हणून 1912 ला संपूर्ण कोल्हापूर संस्थानात सहकारी कायदा लागू केला .शेतीचे आधुनिकीकरण व प्रयोगशील कृती वृत्ती यामुळे कोल्हापूर संस्था पूर्णपणे शेतीवर आधारित होते शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी त्यांनी पारंपारिक शेती करून आधुनिक पद्धती आधुनिक तंत्रज्ञान नववी बियाण्यांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना

प्रोत्साहन दिले याबरोबरच एक महत्त्वाची बाब म्हणजे की पीक लागवडी संदर्भातील प्रयोगशील दृष्टी त्यांनी केलेले आहे ते म्हणजे राजाराम कॉलेजच्या लागून असलेल्या जमिनीवर आदर्श शेतीचा प्रयोग सुरू ठेवला तसेच संस्थानातील लोकांना प्रत्यक्ष रूपी स्वरूपात शेतीची आधुनिक स्वरूप दाखवून देण्यासाठी तसेच विविध भागातील शेतीची प्रगती लोकांना निदर्शनास आणून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कृषी प्रदर्शने भरवण्यास सुरुवात केली आणि कोल्हापूर संस्थानातील पहिले जनावरांचे प्रदर्शन भरवले गेले ते म्हणजे 6 फेब्रुवारी 1896 रोजी चिंचली येथे पहिले शेती व जनावरांचे प्रदर्शन भरवले कोल्हापूर संस्थाना संस्थानातील अनेक लोक हे कृषी आधारित होते पण कृषी आधारित जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे शाहू महाराज यांनी जोड व्यवसायांना प्राधान्य दिले त्यामध्ये कुक्कुटपालन मेंढ्या पालन रेशीम उद्योग यासारख्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन त्यांनी लोकांना रोजगार निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले असे वरील सर्व विवेचन पाहता असे लक्षात येते की शाहू महाराज यांनी त्यांचे सर्व धोरणे व कार्यक्रम हे फक्त कागदावरच लिखित स्वरूपात नसून तर ते कृती स्वरूपात होते अनेक शेती अर्थशास्त्राचाच एक भाग म्हणून ते सर्व ध्येय धोरणे राबवत होते.

**शाहू महाराज आणि औद्योगिक विकास:**

शाहू महाराज यांनी कृषी कृषी क्षेत्राचाच विकास न करता कृषी क्षेत्राबरोबरच व्यापार व उद्योगधंद्याचा विकास करण्यावर सुद्धा भर दिला यासाठी ते सदैव प्रयत्नशील होते कोल्हापुरामध्ये गुळाचा व्यापार मोठा होत होता आणि मुंबई व गुजरात येथील व्यापार पेठेला मोठी मागणी होती हे गोष्ट महाराजांच्या लक्षात येऊन प्रगत व्यापारामुळे व्यापारी व शेतकऱ्यांचा फायदा व्हावा यासाठी 1895 मध्ये रेल्वे स्टेशन जवळ शाहूपुरी या बाजारपेठेची स्थापना केली तसेच पुणे मुंबई येथील व्यापाऱ्यांना कोल्हापुरात येण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी सवलती दिल्या गेल्या जेणेकरून व्यापार वाढावा व कोल्हापूरचा आर्थिक विकास व्हावा तसेच कोल्हापूर शहराच्या आसपास असणारे जे काही शहरे होतील उदाहरणार्थ कागल निपाणी यासारख्या प्रदेशांमधील भांडवलदारांना कोल्हापूर येथील शाहू प्रति व्यापार सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले तसेच कनिष्ठ जातीतील उत्साही तरुणांना जे स्वयंरोजगार व जोड व्यवसाय करण्यासाठी तयार होते त्यांना त्यांनी प्रोत्साहन देऊन उद्योग व्यवसाय उभारणीसाठी मोलाचे सहकार्य केले त्यामुळे शाहूपुरीत शाहूपुरीची व्यापार पेठ वाढत गेली तसे तिथे वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झाला आणि मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करण्यास करण्यामागील ही व्यापार पेठ म्हणून प्रसिद्ध झाले व्यापारा इतकेच उद्योगधंद्यांच्या निर्मितीला सुद्धा त्यांनी प्रचंड प्रोत्साहन दिले कारण या प्रत्येक जण हा व्यापार करेलच असे नाही आणि म्हणूनच ज्यांना व्यापार जमत नाही त्यांना उद्योगधंद्यामध्ये गुंतून ठेवण्यासाठी 1906 मध्ये शाहू महाराज यांनी शाहू छत्रपती स्पलिंग आणि विविंग मिलचा पाया घातला 1907 मध्ये सहकारी तत्त्वावर एका कापड गिरणीची उभारणी केली या गिरणीसाठी महाराजांनी शाहूपुरीतील पूर्वेकडील मोकळे मैदान व कोठीतीर्थ तलावाची जागा फुकट दिली या काळातच शिरोळ रोडवर सुरू झालेल्या जिनिंग फॅक्टरी व हातमाग फॅक्टरीलाही महाराजांनी आर्थिक सहकार्य केले कोल्हापूर संस्थांच्या परिसरात आणखीन कोणते उद्योग धंदे सुरू करता येतील का हा निश्चयच केला. महाराजांनी पुन्हा एकदा सहकाराची ज्ञानगंगा आणि मुहूर्तमेढ रोवली शाहू मिल यामुळे अनेक लोकांना रोजगार निर्माण झाले, रोजगार मिळण्यास सुरुवात झाली .अनेकांची कुटुंबे या शाहूमील सारख्या कापड गिरणीवर अवलंबून झाले आणि यामुळे खरोखरच शाहू महाराज यांचे कार्य किंवा कृती ही प्रत्यक्ष कागदावर न राहता त्यांनी प्रत्यक्षपणे व सत्यात उतरवली हे वरील औद्योगिक विकासावरूनच दिसून येते. कोल्हापूरच्या आर्थिक विकासामध्ये उद्योगधंद्यांची तसेच सहकाराची आणि व्यापाराची मूर्तमेढ रोवण्याचं सर्वात मोठं श्रेय जर कोणाला जात असेल तर ते छत्रपती शाहू महाराज यांना.

**शाहू महाराज आणि सेवा क्षेत्रातील योगदान:**

सेवा क्षेत्रात मुख्यत: शिक्षण आणि आरोग्य विभागांचा समावेश होतो. शिक्षणाचं महत्त्व महाराजांना नैसर्गिक समजलं होतं. कोल्हापूर, नाशिक, पुणे, नागपूर, पंढरपूर, कराड अशा ठिकाणी महाराजांनी शैक्षणिक प्रकल्पांना, वसतिगृहांना मदत केली. कोल्हापूर इथं जैन, लिंगायत, मुस्लिम, ब्राह्मण, मराठा या समाजांची स्वतंत्र वसतिगृहं सुरू करण्यासाठी जागा दिल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचं, मोफत करण्यात आलं. दुय्यम शाळांना प्रोत्साहन देण्यात आलं. राजाराम कॉलेज सुरू करण्यात आलं. मागास प्रदेशात शिक्षण विस्तार, वसतिगृ ृहांची स्थापना, शैक्षणिक, प्रशासन सुधारणा ही महाराजांच्या शिक्षण धोरणाची मुख्य सूत्रं होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचं करणारा कायदा १९१७मधे झाला. हा क्रांतिकारक निर्णय होता. शिक्षण खर्चाची तरतूद करण्यासाठी क्षमतेवर आधारित शैक्षणिक अधिभार बसवण्यात आला.

शाहू महाराजांनी १८८७ला 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट', १९२४ला 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल', १९१२ला 'किंग एडवर्ड शेती, शिक्षण संस्था', 'प्रशिक्षण, शिक्षण प्रशिक्षण, सत्यशोधक, पुरोहित शाळा', 'युवराज शाळा', 'सैनिकी शाळा' अशा विशेष शिक्षण संस्थाही सुरू केल्या. त्याचबरोबर 'देवल क्लब', 'तलाठी प्रशिक्षण संस्था', 'संस्कृत

शाळा', 'उर्दू शाळा', 'रात्र शाळा' सुरू करण्यात आल्या. सर्वात विशेष म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १९११मधे शुल्कमाफी जाहीर करण्यात आली.

१९१३ला मागासवर्गीयांसाठी प्रत्येक खेड्यात शाळा असाही निर्णय घेण्यात आला. राजर्षींनी मुलींच्या शिक्षणसाठीही पुढाकार घेतल्याचं दिसतं. गुणवत्ता शिष्यवृत्त्या आणि शैक्षणिक मदत देण्याची व्यवस्थाही महाराजांनी केली. त्यासाठी १६ शैक्षणिक सक्षमता निधी उभारले होते. ग्रंथालयांना निधी दिले जात.

**आरोग्य क्षेत्र:**

शाहू महाराजांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे पूर्णत: लक्ष दिल्याचं दिसतं. प्लेगच्या काळात विलगीकरणाची व्यवस्था केली गेली. १९१९च्या एन्फ्ल्यूएन्झा साथीत महाराजांनी कसोशीने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था राबवली. महाराजांच्या काळापूर्वीच 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' सुरू करण्यात आलं. सध्या हेच हॉस्पिटल 'छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल' म्हणून ओळखलं जातं.

**सांराश:**

खरं तर राजर्षी शाहू महाराजांची राज्यव्यवस्था सामान्यांच्या हितासाठी; दुर्बलांच्या मदतीसाठी; सर्वांना समान न्याय देण्यासाठी; शेती, उद्योग, व्यापार यांच्या विकासासाठी कार्यरत होती. राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यांचं संतुलन साधण्याचा, तेव्हाच्या परिस्थितीत युगप्रवर्तक प्रयोग केला, हे मान्यच करावं लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

1. पवार जयसिंगराव, लठ्ठे आण्णासाहेब श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2. जयसिंगराव पवार, राजर्षि शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी. कोल्हापूर.
3. कॉं. गोविंद पानसरे, १९९७, राजर्षि शाहू  वसा आणि वारसा, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.
4. समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २०१४,
5. जयसिंगराव पवार, २००१, राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
6. जाधव रमेश,२००५, लोकराजा शाहू धत्रपती, सुरेश एजन्सी, कोल्हापूर.
7. राजर्षि शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, प्राचार्य रा. तु. भगत, सिद्धराज प्रकाशन, पुणे.
8. आर्थिक विचारांचा इतिहास, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. आर. ए. वाईंगडे, डॉ. एस. बी. यादव, फडके प्रकाशन